Let the mind manage the body
Que l'esprit gère le corps

**Index Number:** ..........................................................................

# NATIONAL CERTIFICATE OF EDUCATION

March / April 2021

## MARATHI (N640)

**TIME: 2 HOURS 15 MINUTES**

Candidates answer on the Question Paper.

---

**INSTRUCTIONS TO CANDIDATES**

1. Write your index number in the space provided above.
2. Write in dark blue or black ink.
3. Any rough working should be done in this booklet.
4. Answer **ALL** questions.
5. This document consists of **10** questions printed on **15** pages.
6. The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.
7. The total of the marks for this paper is **100**.

| For Examiners' use | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Question No.** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **Total** | **Signature** |
| **Marker** | | | | | | | | | | | | |
| **Team Leader** | | | | | | | | | | | | |
| **Quality Controller** | | | | | | | | | | | | |
| **CE/ACE** | | | | | | | | | | | | |

© Mauritius Examinations Syndicate

Marks

**Question 1 (15 Marks)**

**प्रश्न १ला. योग्य पर्यायाभोवती वर्तुळ काढा.**

१. ताईने सुंदर ......गाणे गाईले. (1 Mark)

अ. आवाजाचे ब. आवाजाची

क. आवाजात ड. आवाजाच्या

**२. कोणते वाक्य व्याकरणशुद्ध आहे?** (1 Mark)

**अ.** मागच्या वर्षी मी शामारेलला आणि तो बाजाराला जाईन.

**ब.** पुढच्या आठवड्यात ती मुंबईला गेली.

**क.** काल आईने कानवले केले होते.

**ड.** दोन वर्षापूर्वी आजोबा माझ्या घरी येतील.

३. **कोणते वाक्य चांगले आहे?** (1 Mark)

**अ.** त्याने अभ्यास केला म्हणून तो परीक्षेत पास झाला.

**ब.** त्याने अभ्यास केल्यास म्हणून तो परीक्षेत पास झाला.

**क.** त्याने अभ्यास केली म्हणून तो परीक्षेत पास झाला.

**ड.** त्याने अभ्यास केल्याने म्हणून तो परीक्षेत पास झाला.

४. **कोणत्या वाक्याच्या शेवटी तुम्ही प्रश्नचिन्ह द्याल?** (1 Mark)

**अ.** राजू कधी पुस्तक वाचतो

**ब.** राजू पुस्तक वाचेल

**क.** राजू पुस्तक पिशवीत ठेवतो

**ड.** राजूने पुस्तक वाचले

५. दादा गाडी .................... . (1 Mark)

अ. धुतो ब. धुते

क. धुतली ड. धुतल्या

**६. अधोरेखित शब्दाचे अनेकवचनी रूप लिहून वाक्य परत लिहा.** (1 Mark)

विमला पेरूच्या झाडाला पाणी घालते.

..........................................................................................................

**७. पुढील वाक्यात योग्य ठिकाणी स्वल्पविराम द्या.** (1 Mark)

रिना मीना आणि रूपा एकत्र बसून भाकरी भाजी व पुलाव जेवल्या.

..........................................................................................................

**८. अधोरेखित नामाऐवजी योग्य सर्वनाम लिहा.** (1 Mark)

शालिनी चित्रपट पाहायला गेली. [ ] चित्रपट खूपच आवडला.

**९. खाली दिलेले वाक्य भविष्यकाळात लिहा.** (1 Mark)

मंजूने आम्हाला चहा दिला.

..........................................................................................................

**१०. संधी करा.** (1 Mark)

देव + आलय = ..................................

**११. संधी विग्रह करा.** (1/2 Mark for each correct answer)

चंद्रोदय = ..................... + ......................

१२. डोडो हा मॉरिशसचा राष्ट्रीय पक्षी आहे. **(प्रश्नार्थी वाक्य करा.)** (1 Mark)

........................................................................................................................

१३. मे महिन्यात शाळेला सुट्टी असते. **(नकारार्थी वाक्य करा.)** (1 Mark)

........................................................................................................................

**१४. अधोरेखित शब्दाचा स्त्रीलिंगी शब्द लिहून वाक्य परत लिहा.** (1 Mark)

माझ्या <u>दादाने</u> बटाटे आणले.

........................................................................................................................

**१५. रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय लिहून वाक्य पूर्ण करा.** (1 Mark)

निलेशचा दहावा वाढदिवस आहे ............... आजोबांनी केक आणला.

**Question 2 (5 Marks)**

**प्रश्न २रा. योग्य पर्यायाभोवती वर्तुळ काढा.**

१. मी काहीही विकत घेऊ शकत नाही. मी माझे ........... घरी विसरलो.

अ. बूट ब. ग्लास

क. पैसे ड. चष्मा

२. माझ्या वडिलांची गाडी घाणेरडी आहे. ती त्यांनी ........... पाहिजे.

अ. पाहा ब. धुतली

क. विक ड. उघड

३. शिला एक खूपच .............मुलगी आहे. ती कधीच वर्गात बोलत नाही.

अ. शांत　　　　ब. सुंदर

क. उंच　　　　ड. रागावलेली

४. माझ्या आईला खूप .......... वाटते कारण माझा भाऊ हॉस्पिटलमध्ये आहे.

अ. आनंदी　　　　ब. गर्विष्ठ

क. समाधानी　　　　ड. काळजी

५. शिक्षकाने ............, " तू गृहपाठ का केला नाहीस?"

अ. रडवले　　　　ब. विचारले

क. शिकवले　　　　ड. सांगितले

**Question 3 (10 Marks)**

**प्रश्न ३रा (अ). खालील पत्र वाचा आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

प्रिय शीतल,

माझ्या वाढदिवसानिमित्त मी शुक्रवारी माझ्या कुटुंबासहित सहलीला जात आहे. आम्ही शामारेलला जाण्यासाठी १० वाजता घरातून निघू.

त्यानंतर आम्ही ब्लू बेला जाऊ. दुपारचे जेवण आम्ही तेथेच घेऊ. माझ्या आईने मला त्या दिवशी माझ्या आवडीचे जेवण – बिर्याणी करण्याचे आश्वासन दिले आहे.

आम्ही संध्याकाळी साधारण ६ वाजता घरी परत येऊ.
जर तू आमच्याबरोबर आलीस तर मला आनंद होईल.

तुझी मैत्रीण
जया

**उदा : पत्र लिहिणारी : जया**

१. सहलीचा दिवसः

...................................................................................................................

२. ठिकाण जेथे ते **पहिले** गेलेः

...................................................................................................................

३. ठिकाण जेथे त्यांनी दुपारचे जेवण घेतलेः

...................................................................................................................

४. जयाचे आवडते जेवणः

...................................................................................................................

५ वेळ जेव्हा ते घरी परत येतीलः

...................................................................................................................

(5 marks)

**प्रश्न ३रा (ब). खालील जाहिरात पत्रिका वाचा आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**क्रीडा मंत्रालय**

**क्रीडादिन २०२१**

क्रीडा मंत्रालयातर्फे सर्व कॉलेजच्या विद्यार्थ्यांना वार्षिक क्रीडादिनानिमित्त सहर्ष आमंत्रित करताना आनंद होत आहे.

कार्यक्रम असा आखलेला आहे.




**तारीखः** ११ ऑक्टोबर २०२१

**स्थळः** शॉं दे मार्स

**वेळः** सकाळी ९ ते दुपारी ४

**प्रवेश तिकीट** : ५०रुपये, तुम्हाला दुपारचे जेवण आणि पाण्याची बाटली दिली जाईल.

या दिवशी आमच्याबरोबर मजा करण्यास या.

क्रीडा मंत्रालय

रॉयल रोड, रोझ–हिल

☎ ४६४८३२१

**उदा :** **प्रश्नः** कसला कार्यक्रम करत आहेत ?

**उत्तरः** वार्षिक क्रीडादिन

(i) कोणते मंत्रालय कार्यक्रम करत आहे ?

.........................................................................

(ii) कोणत्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमात भाग घेण्यासाठी आमंत्रण दिले आहे ?

.........................................................................

( iii ) कार्यक्रम कोठे असेल ?

........................................................................

( iv ) किती वाजता कार्यक्रम सुरू होईल ?

........................................................................

( v ) कार्यक्रमाच्या तिकिटाची किंमत किती आहे?

........................................................................

(5 marks)

**Question 4 (5 Marks)**

**प्रश्न ४था. खाली दिलेल्या वाक्यांतील ठळक शब्दांचे योग्य रूप लिहा. एक उदाहरण दिलेले आहे.**

सेतकास्काद येथे पूर्वी जंगल (**असणे**) **होते** . ते जंगल **(काप)**........... गेले. मग तेथे **(केळे)**........... शेती सुरू झाली. लोक शेतात काम **(कर)**............ लागले. त्याकाळी लोक **(पाय)**.......... चालत जात असत. त्या भागात फारच कमी **(घर)**........... होती.

**Question 5 (5 Marks)**

**प्रश्न ५वा. खालील उताऱ्यात एकूण ५ चुका आहेत. एक उदाहरण दिलेले आहे. अधोरेखित शब्द सुधारून परत लिहा.**

काल खूप **माठा** **(मोठा)** पाऊस पडला. रवी आणि विजया खिडकीतून **अंगणे** **(............)** साचलेले पाणी पाहत होते. त्यांच्या **मनत** **(.............)** एक विचार आला. त्यांनी वहीतील एक कागद **फाडली** **(.............)** त्या कागदाची **नव** **(............)** करून पाण्यात वाहिली. **तो** **(.............)** पाण्यात पुढे वाहत जाऊ लागली.

Marks

**Question 6A (5 Marks)**

**प्रश्न ६वा (अ). खाली दिलेले योग्य शब्द निवडून रिकाम्या जागी भरा. एक उदाहरण दिलेले आहे.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पोहोचला | झाड | दुसरा | नदीत | चोरू | ~~पाहिला~~ | लगेच |

एकदा एका कुत्र्याने जमिनीवर असलेला एक हाडाचा तुकडा **पाहिला**. त्याने तो तुकडा ............. उचलला आणि घराच्या दिशेने पळू लागला. त्याला हाडाचा तुकडा दुसऱ्या कुत्र्याने ............. नये असे वाटत होते. काही वेळानंतर तो एका पुलावर ............ जेव्हा तो पुलावरून जात होता तेव्हा त्याने ............ पाहिले. त्याला ............ कुत्रा त्याच्याकडे पाहताना दिसला. त्या कुत्र्याच्या तोंडातदेखील एक हाडाचा तुकडा होता.

**Question 6B (5 Marks)**

**प्रश्न ६वा (ब). खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून उतारा पूर्ण करा.**

मूर्ख कुत्रा! त्याने हा ............ केला नाही की तेथे दुसरा कुत्रा नव्हता. खरे तर, तो स्वतःलाच पाण्यात पाहात होता. त्याने पाण्यात उडी ............कारण त्याला दुसरा हाडाचा तुकडा हवा होता. तो ............ झाला जेव्हा त्याने पाहिले की तेथे दुसरा कुत्रा नव्हता. हाड त्याच्या तोंडातून ............ पडले. बिचारा कुत्रा, त्याच्याकडे काहीच उरले नव्हते. ........... दुःखी होऊन तो पाण्याबाहेर आला. जर त्याने लोभ केला नसता तर!

Marks

**Question 7 (10 Marks)**

**प्रश्न ७वा.** तुम्ही एका मनोरंजक ठिकाणाला भेट दिली. तुम्ही तुमच्या मित्राला/ मैत्रिणीला हे सांगण्यासाठी पत्र लिहिण्याचे ठरविले.

खालील मुद्यांवर ५० ते ६० शब्दांचे पत्र लिहा.
खालील मुद्दे लेखनात येऊ द्या.

- तुम्ही कोठे गेला होता?
- तेथे तुम्हाला त्या ठिकाणाबद्दल अधिक मनोरंजक काय वाटले?
- तेथे तुम्ही काय केले?
- तुमच्या मित्राला/ मैत्रिणीला हे ठिकाण आवडेल असे तुम्हाला का वाटते?

प्रिय ........................ ,

............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................
............................................................................................................................

तुझा मित्र/ मैत्रीण

**Question 8 (15 Marks)**

**पुढील उतारा वाचा.**

सुबोध एक बारा वर्षांचा मुलगा होता. तो जंगलात लाकडे शोधण्यासाठी गेला. एकाएकी त्याला ढोल वाजत असलेला ऐकू आला. तो आवाज अधिक मोठा होत होता. ढोल वाजवणे म्हणजे एकच गोष्ट होती. ती म्हणजे संकट. हे त्याला ठाऊक होते. तो जेवढ्या वेगाने शक्य असेल तेवढ्या वेगाने गावाच्या दिशेने धावला. जेव्हा सुबोध गावाजवळ येत होता तेव्हा त्याला काठ्या घेतलेले लोक सर्व दिशांनी धावताना दिसले.

"सुबोध" त्याच्या वडिलांनी त्याला पाहताच हाक मारली ,"हत्तीचा कळप या दिशेने येत आहे. ते गावात पोहोचण्याअगोदर त्यांना शोधून थांबवले पाहिजे." असे म्हणत त्यांनी सुबोधला काठी दिली.

सुबोध आणि गावातील लोक बराच वेळ चालले. ते सर्वजण तहानलेले आणि थकलेले होते. त्यांनी अनेक जनावरे पाहिली पण हत्ती दिसले नाहीत. "कदाचित हत्ती या दिशेने येणार नाहीत. चला, आपण घरी जाऊ या." सुबोधने सुचवले.

परंतु गावातील लोकांनी नकार दिला आणि चालत राहिले. काही वेळाने सुबोधने एक उंच झाड पाहिले. "इथे थांबा!" तो ओरडला. "मी त्या झाडावर चढतो. हत्ती येत आहेत की नाही मी हे पाहू शकेन."

झाडावर चढल्यावर सुबोधने हत्तीचा संपूर्ण कळप पाहिला. "ते आपल्या गावाकडे जात आहेत." सुबोध घाबरून ओरडला. जनावरे निघून जातील अशी आशा करून गावातील लोक ढोल वाजवू लागले. आवाज ऐकताच हत्तींनी आपली सोंड उचलली. ते मोठ्याने चित्कारले पण थांबले नाहीत. ते गावाच्या दिशेने गेले.

त्यावेळी छोटा हत्ती मोठा आवाज ऐकून घाबरला. तो सुबोध जेथे होता त्या झाडाच्या दिशेने पळाला. सुबोधचे वडील ओरडले, " सुबोध! सावध राहा. तो तुझ्यावर हल्ला करेल."

जसजसा हत्ती जवळ येऊ लागला तसतसा सुबोधने काय करावे याचा विचार केला. त्याला आठवले की त्याच्या खिशात एक शिटी होती. त्याने ती खिशातून काढली आणि जेवढ्या मोठ्याने वाजवता येईल तेवढी वाजवली.

सुदैवाने छोटा हत्ती थांबला. तो मागे वळून कळपाबरोबर गेला. हत्तीच्या आईने त्याला तिच्याकडे येताना पाहिले. हत्तीच्या कळपाने सुबोधकडे कृतज्ञतेने पाहिले कारण सुबोधने छोट्या हत्तीला बिलकुल इजा केली नव्हती. ते हळूच वळले आणि परत गेले.

गावातील लोक सुबोध ठीक आहे का, हे पाहण्यासाठी झाडाजवळ धावत गेले. सुबोध झाडावरून खाली उतरला. गावातील लोकांनी त्याला उचलले आणि “सुबोध, आमचा वीर! आमचा रक्षक!” असे गात गात गावाकडे परत नेले.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सुबोध जंगलात का गेला? (1 Mark)

..............................................................................................................

..............................................................................................................

२. वाजणाऱ्या ढोलाच्या आवाजाबद्दल सुबोधला काय माहित होते? (1 Mark)

..............................................................................................................

..............................................................................................................

३. गावातील लोकांना कसला त्रास होत होता? (1 Mark)

..............................................................................................................

..............................................................................................................

Marks

४. सुबोधला त्याच्या वडिलांनी काठी का दिली? (1 Mark)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

५. गावातील लोक थकलेले आणि तहानलेले का होते? (1 Mark)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

६. "त्यांनी अनेक जनावरे पाहिली पण हत्ती दिसले नाहीत." तेव्हा त्या क्षणी सुबोधने काय सुचवले?

(1 Mark)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

७. सुबोध उंच झाडावर का चढला? (1 Mark)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

८. गावातील लोकांनी पुन्हा ढोल वाजवायला सुरुवात का केली? (1 Mark)

..........................................................................................................................

..........................................................................................................................

९. जेव्हा छोटा हत्ती सुबोध असलेल्या झाडाजवळ जात होता तेव्हा सुबोधच्या वडिलांना कसली काळजी वाटत होती? (1 Mark)

.............................................................................................................

.............................................................................................................

१०. सुबोधने हत्तीला कसे थांबवले? (1 Mark)

.............................................................................................................

.............................................................................................................

११. हत्ती का कृतज्ञ होते? (1 Mark)

.............................................................................................................

.............................................................................................................

१२. गोष्टीच्या अखेरीस गावातील लोक सुबोधवर का खुश होते? (1 Mark)

.............................................................................................................

.............................................................................................................

१३. शब्दार्थ :

अ) ओरडला – ....................

ब) कळप – ....................

क) घाबरला – .................... (3 Marks)

**Question 9A (5 Marks)**

**प्रश्न ९वा (अ). खाली दिलेल्या शब्दांचे मराठीत भाषांतर करा.**

i ) A watch – ………………

ii) Library – ………………

iii) To dance – …………..…..

iv) Delicious – ………………

v) Sometimes – ………………

**Question 9B (5 Marks)**

**प्रश्न ९वा (ब). खालील परिच्छेदाचे मराठीत भाषांतर करा.**

One day Kevin went fishing. He found a nice place close to the sea. He started fishing. After a while, he caught a big fish. He went home happily.

……………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………

**Question 10 (15 Marks)**

**खाली दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर सुमारे १५० शब्दांचा निबंध लिहा.**

तुमच्या शाळेतील एका खास प्रसंगाचे वर्णन करा.

(उदा. बक्षीस समारंभ किंवा संगीत दिवस इत्यादी) (जे काही तुम्हाला दिसले, जे तुम्ही ऐकले, तेथे असलेली माणसे आणि वातावरण यांचे वर्णन करावे लागेल.)

**किंवा**

खालील ओळीसहित गोष्ट लिहा.

“ त्यांनी एकमेकांकडे पाहिले पण काहीच बोलले नाहीत.”

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

................................................................................................................................................

Marks



Please turn over this page

BLANK PAGE

BLANK PAGE

BLANK PAGE